29 APR 2026
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात १०१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. मंगळवारी विविध १०१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १८४ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षांसाठी २४८०८ विद्यार्थी उपस्थित होते. मंगळवारी रोजी B.I.D. Sem.I & II, B.Voc. Nursing & Hospitality Sem.V & VI या ४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले असून आजअखेर १४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले आहेत. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रणासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. पथकाकडून कोल्हापूर–१ व सांगली–३ या जिल्ह्यातून चार गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत केलेली आहे. सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद आली नाही. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

29 APR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निकालापूर्वीच वार्षिक सहा लाखांचे आकर्षक पॅकेज

## जिओइन्फॉरमेटिक्सच्या सात विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये झाली निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागांतर्गत चालणाऱ्या 'एम.एस्सी. जिओइन्फॉरमेटिक्स'च्या विद्यार्थ्यांनी ज्ञानकौशल्याच्या जोरावर रोजगाराच्या संधींना गवसणी घातली आहे. २०२३ पासून सुरू झालेल्या या विशेष अभ्यासक्रमाच्या सात विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी पूर्ण करण्यापूर्वीच नामांकित राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये स्थान मिळवून विद्यापीठाचा लौकिक वाढविला आहे.

या प्लेसमेंट मोहिमेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना देशातील विविध महत्त्वाच्या शहरांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. यात श्रद्धा नाईकबा यादव (स्कायलार्क ड्रोन्स कंपनी, बंगळुरू), निकिता राजेंद्र जाधव (आयमेरिट टेक्नॉलॉजी', पुणे), शेखर मुत्तप्पा कांबळे (अर्थयार्ड इन्फोटेक, राजस्थान), शुभम रामचंद्र पाटील जिओ-इन्फो सर्व्हिसेस, नवी मुंबई, मोहिनी राजाराम सुतार (ॲटलास जिओग्राफिक डेटा प्रा. लि., पुणे), निर्मिती वैभव दुरे (एल.ई.ए. असोसिएट्स साउथ एशिया प्रा. लि., मुंबई), राहुल गोसावी (टेरा इन्फॉर्मेटिक सर्व्हिसेस, पुणे) यांचा समावेश आहे. यातील काही विद्यार्थ्यांना वार्षिक ६ लाखापर्यंतचे पॅकेज मिळाले. या विद्यार्थ्यांनी अंतिम सत्राची परीक्षा दिली असून, परीक्षेचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच त्यांना या कंपन्यांकडून नियुक्तिपत्रे मिळाली आहेत. या विद्यार्थ्यांना विभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. अभिजित पाटील, डॉ. पी. टी. पाटील, डॉ. व्ही. ए. चौगुले, डॉ. सुधीर पवार आणि शुभम गिरीगोसावी यांचे मार्गदर्शन लाभले.



जिओइन्फॉरमेटिक्सच्या सात विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. त्यांच्यासोबत डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. अभिजित पाटील, डॉ. पी. टी. पाटील, डॉ. व्ही. ए. चौगुले, डॉ. सुधीर पवार आणि शुभम गिरीगोसावी, आदी उपस्थित आहेत.

> **या यशाचे मुख्य गमक म्हणजे विभागाचा 'उद्योगकेंद्रित' अभ्यासक्रम आहे. आजच्या युगात जिओ-स्पेशियल डेटा, ड्रोन तंत्रज्ञान आणि रिमोट सेन्सिंग या क्षेत्रांची वाढती मागणी लक्षात घेऊनच हा अभ्यासक्रम तयार केला आहे. विभागाकडे स्वतःच्या अत्याधुनिक प्रयोगशाळा आहेत. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता थेट कामाचा अनुभव मिळत आहे, ज्याचा फायदा त्यांना प्लेसमेंटदरम्यान झाला.**
>
> **डॉ. सचिन पन्हाळकर,**
> भूगोल विभागप्रमुख

2 9 APR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रंगली 'वचन संगीत संध्या'; रसिक तृप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** धारवाड येथील किराणा घराण्याच्या ख्यातकीर्त शास्त्रीय गायिका विदुषी सुजाता गुरव यांच्या सुमधुर गायनाने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. शिवाजी विद्यापीठ येथील शरण साहित्य अध्यासन आणि संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे महात्मा बसवण्णा जयंतीच्या पूर्वसंध्येला 'वचन संगीत संध्या' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम रंगला.

शरण साहित्य अध्यासनाच्या नूतन इमारतीच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत केले.



वचन संगीत संध्या या कार्यक्रमात सुजाता गुरव यांचे गायन झाले

जयपूर-अत्रौली घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. विनोद डिग्रजकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने उद्घाटन झाले.

यावेळी कलाकारांचा तसेच बसव केंद्र, कोल्हापूरचे विश्वस्त राजशेखर तंबाके यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

विदुषी सुजाता गुरव यांनी मैफलीची सुरुवात राग 'मधुवंती'ने केली. 'सावन की ऋत आये' या विलंबित एकतालातील बंदिशीनंतर 'गोविंद गुण गावो' हा छोटा ख्याल आणि द्रूत एकतालातील तराना सादर केला. यानंतर त्यांनी बसवण्णांच्या कन्नड व मराठी वचनांचे भावपूर्ण गायन केले. 'नुडीदरे मुत्तीन हार...', 'शेट्टी येंबेने...' ही कन्नड वचने तसेच 'जिकडे पहांवे तिकडे तूचि देवा...', 'तव नामाचे अमृत...' ही मराठी वचने सादर झाली. अक्का महादेवी यांचे 'अक्का केळव्वा...' हे वचनही त्यांनी सादर केले. याबरोबरच 'पांडुरंग नामी लागलासे ध्यास' हे भजन आणि 'युवतीमना दारुण रण...' हे नाट्यगीत सादर करण्यात आले. अखेरीस भैरवीतील 'जणितक्के तायागी हेत्तळू माये' याने मैफिलीची सांगता झाली. यश आंबोळे यांनी कन्नड व मराठी वचनांचा भावार्थ सांगत निवेदन केले. तबल्यावर महेश देसाई, संवादिनीवर स्वरूप दिवाण तसेच स्वप्निल सरवदे (टाळ), चिन्मय कुलकर्णी आणि केतकी परांजपे (तानपुरा) यांनीही साथसंगत केली. प्रा. डॉ. भारती पाटील, डॉ. विश्वनाथ मगदूम, डॉ. शिवानंद स्वामीजी, ॲड. अभिषेक मिठारी, सीमा पाटील, विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकुर-देसाई यांचं योगदान लाभले.

29 APR 2026

पुढारी

# एम.एस्सी. जिओइन्फॉरमॅटिक्सच्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागांतर्गत चालणाऱ्या एम.एस्सी. जिओइन्फॉरमॅटिक्स अभ्यासक्रमाच्या सात विद्यार्थ्यांची पदव्युत्तर पदवी पूर्ण होण्यापूर्वी नामांकित राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना देशातील विविध महत्त्वाच्या शहरांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. विभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. अभिजित पाटील, डॉ. पी. टी. पाटील, डॉ. व्ही. ए. चौगुले, डॉ. सुधीर पवार, शुभम गिरीगोसावी यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. दरम्यान, एम. एस्सी. जिओइन्फॉरमॅटिक्स या करिअरच्या दृष्टीने उज्ज्वल भविष्य असलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. ड्रोन सर्वेक्षण, नकाशाशास्त्र, जीआयएस, रिमोट सेन्सिंग यांसारख्या आधुनिक विषयात आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागाने केले आहे.

9/26, 12:06 PM 29 APR 2026 तरुण भारत 20260429_113021.jpg

जनसंपर्क कक्ष
शवाजी विद्यापीठ. कोल्हापूर



ज्ञान-विज्ञान

# गुरुत्वाकर्षणाचा शोध!

डॉ. व्ही.एन. शिंदे

**न्यूटन यांनी गुरूत्वाकर्षणाचा शोध लावला तेव्हा केवळ निसर्ग घटनेचे गूढ उकलले असे सर्वांना वाटत होते, मात्र गुरूत्वाकर्षणाचा शोध क्रांतिकारी ठरला.**

विज्ञानातील अनेक शोध अपघाताने लागले असे जे म्हटले जाते ते निश्चितच खोटे आहे. एखाद्या समस्येची उकल अपघाताने होऊ शकते, मात्र त्या अचानक उलगडलेल्या समस्येमागे त्या संशोधकाचे त्या विषयातील कित्येक वर्षांचे चिंतन असते. ज्या घटनेतून एखाद्या संशोधकाने, शास्त्रज्ञाने शोध लावलेला असतो, तशी घटना अनेकांच्या समोर घडलेली असते. मात्र ही घटना का घडते, कशी घडते, केव्हा घडते, कोठे घडते, काय घडते असे प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात येत नाहीत. आले तरी वरवरचा विचार करून किंवा 'देवाची किमया' म्हणून अशा घटनांना सोडून दिले जाते. मात्र, संशोधक अशा घटनांना सोडत नाहीत, ते सातत्याने त्यावर चिंतन करतात, पूर्वी मांडलेले त्याच विषयाचे संदर्भ शोधतात, त्या विषयातील समकालीन संदर्भ तपासतात आणि आपला त्यावर अचूक निष्कर्ष काढतात. असाच एक चिंतन आणि अनुभवातून लागलेला शोध म्हणजे गुरूत्वाकर्षण!

न्यूटन. जगातील कोणत्याही देशात, लहानपणीच असाधारण विचार करणाऱ्या मुलाला या नावाने चिडवले जाते, इतके जनमानसात रूजलेले नाव. त्यांनी गुरूत्वाकर्षणाचा शोध लावला आणि विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीने गती घेतली. न्यूटन यांच्या जन्मापूर्वी नव्हे, तर पृथ्वीच्या निर्मितीपासून कोणतीही वस्तू पृथ्वीकडेच ओढली जाते. सजीव सृष्टीत वनस्पतींची पाने, फुले, फळे, वाळलेली लाकडे, मोडलेल्या फांद्या हे सर्व काही पृथ्वीवर येऊन चिरनिद्रा घेत असे. पावसाचे थेंबही पृथ्वीवरच येतात. माणसाने जसे घडणाऱ्या घटनांचे निरीक्षण करून अनुभव घेण्यास सुरुवात केली, तेव्हापासून त्याला हे ज्ञात होते की, कोणतीही वस्तू वर फेकली तर ती आकाशात जात नाही, ती शेवटी पृथ्वीवरच परत येते. तेव्हापासून न्यूटनने गुरूत्वाकर्षणाचा शोध लावेपर्यंत जगभरातील सर्वच देशांतील फळांच्या झाडाखाली मुले बसली असणार. त्यांच्या समोर अशी फळेही पडली असणार. फरक फक्त एवढाच, न्यूटनच्या देशात सफरचंद पडत असतील, भारतातील हिमाचल प्रदेशातही सफरचंद पडले असतील, तसे महाराष्ट्रातील युवकांसमोर आंबे पडले असतील. ही पडणारी फळे कशी खायची याचा विचार बहुतेकांनी केला असणार. त्यातील काहींनी आकाशात उंच दगड, वस्तू फेकायचे प्रयोगही केला असतील, मात्र न्यूटन यांनी याचा गांभीर्याने विचार केला आणि गुरूत्वाकर्षण त्या फळाला खाली खेचते असे सर्वप्रथम सांगितले.

फळ किंवा कोणतीही वस्तू खाली येते, म्हणजेच कोणीतरी त्याला खाली खेचते. हे खाली खेचणारे काय आहे, याचा त्यांनी नेमका शोध घेतला. त्यापूर्वी कोपर्निकस, केपलर आणि गॅलिलिओ या संशोधकांनी ग्रह ताऱ्याभोवती फिरतात, कारण त्यांना अदृश्य बल बांधून ठेवते असे सांगितले होते. निकोलस कोपर्निकस यांच्यानंतर केपलर आणि गॅलिलिओ यांनी या क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले. केपलर आणि गॅलिलिओ तसे समकालीन. यातील केपलर यांनी सर्व ग्रहांच्या कक्षा कशा आहेत, त्यांच्या कक्षांचे क्षेत्रफळ आणि आवर्तनाचा कालावधी यांचे निश्चित असे नियम मांडले. मात्र, या ग्रहांना ताऱ्यांशी बांधून ठेवून विशिष्ट कक्षेत फिरायला भाग पाडणारे बल कोणते हे नेमकेपणाने सांगितले नव्हते. त्यांनी केलेल्या कार्याने संशोधकांना विशिष्ट टप्प्यावर आणले होते. त्या टप्प्यावर खऱ्या अर्थाने रमले आणि पुढे झेपावले ते आयझॅक न्यूटन.

गॅलिलिओ यांचे निधन झाले त्याच वर्षी १६४२ साली ख्रिसमसच्या दिवशी न्यूटनचा जन्म झाला. त्यांच्या जन्मापूर्वीच वडिलांचे निधन झाले. त्यानंतर आईने एका जमीनदार उमरावाशी लग्न केले. त्यांची मोठी संपत्ती न्यूटन यांनी सांभाळावी, शेती करावी असे आई आणि सावत्र वडिलांचे मत होते. मात्र, न्यूटनना शिकायचे होते. एकदा ते असेच शेतात बसले होते तेव्हा वारा सुटला होता. ते एका मोठ्या दगडावर उभे राहून वाऱ्याच्या दिशेने आणि विरुद्ध असे दोन्हीकडे उड्या मारून जमिनीवर खुणा करत असताना मामाने पाहिले. त्यांनी न्यूटनना 'काय करतो' असे विचारले. न्यूटननी 'वाऱ्याचा वेग मोजत असल्याचे' सांगितले. त्यांच्या या कृतीवरून मामाने न्यूटनची क्षमता ओळखली. बहिणीचे मन वळवले आणि न्यूटन यांचे शिक्षण पुढे सुरू झाले. पुढे १६६१ मध्ये आलेल्या प्लेगच्या साथीने शिक्षण संस्था बंद झाल्या. तोपर्यंत त्यांनी प्रमाण अभ्यासक्रमाच्या पुढे जाऊन देकार्तसारख्या गणितज्ज्ञांच्या मांडणीचा अभ्यास केला होता. त्याचबरोबर ज्ञानप्राप्तीसाठी पूर्वासुरींच्या मांडणीचा अभ्यास करत असताना निरीक्षण आणि अनुभवही तितकाच महत्त्वाचा असतो हे त्यांच्या लक्षात आले होते. कोणतेही सूत्र मांडताना त्याला प्रयोगाच्या सहाय्याने सिद्ध कसे करता येईल याचा ते विचार करू लागले. सफरचंद पडताना पाहून त्यांनी कोपर्निकस, केपलर, गॅलिलिओ यांच्या कार्यातील अज्ञात बलच सफरचंदालाही खाली खेचत असावे हे जाणले. हे अज्ञात बल म्हणजेच गुरूत्वाकर्षण. न्यूटन यांनी 'ग्रॅव्हिटेशन' हा शब्द लॅटिन भाषेतील 'ग्रॅव्हिटाज' म्हणजेच वजन या शब्दावरून घेतला. पृथ्वीचे गुरूत्वीय बल चंद्रापर्यंत आहे आणि तेच चंद्राला पृथ्वीसोबत बांधून ठेवत असल्याचेही सांगितले. मात्र, हा निष्कर्ष ते जास्त आक्रमकपणे मांडत नसत, कारण त्या काळात हे सिद्ध करण्यासाठी ते प्रयोग करू शकत नव्हते. मात्र, न्यूटन यांच्या गुरूत्वीय बलाच्या सिद्धांतामुळे केपलर यांनी मांडलेले ग्रहांच्या कक्षा, आवर्तन काल आणि कक्षेच्या क्षेत्रफळांचे नियम सिद्ध झाले आणि संशोधकांना नवी दालने खुली करून दिली.

पृथ्वीच्या विविध भागांत गुरूत्वीय बल किती आहे हे संशोधकांनी शोधले. पुढच्या तीन-चारशे वर्षांत या शोधाचा आधार घेत संशोधकांच्या कल्पनांना नवे पंख फुटू लागले. यातील महत्त्वाचा मुद्दा होता तो किती बल लावले, किती वेगाने वस्तू पाठवली तर ती पृथ्वीचे गुरूत्वाकर्षण भेदून बाहेर पडेल. याचा शोध घेताना संशोधकांनी सुटकेसाठी आवश्यक गती (एस्केप व्हेलासिटी) मिळाली. एकदा ही गती शोधल्यानंतर अवकाशात यान म्हणजेच कृत्रिम उपग्रह पाठवण्याचा मार्ग खुला झाला. यानंतर वेगाने प्रगती होत गेली आणि चंद्रावर मानवाने पाऊल टाकले. पुढचा टप्पा होता इतर ग्रहावर काय आहे हे शोधण्यासाठी उपग्रह पाठवण्याचा. न्यूटन यांनी गुरूत्वाकर्षणाचा शोध लावला, तेव्हा केवळ निसर्ग घटनेचे गूढ उकलले असे सर्वांना वाटत होते. मात्र, गुरूत्वाकर्षणाचा शोध क्रांतिकारी ठरला. या शोधाने अवकाश संशोधनाचे क्षेत्र वेगाने विस्तारले. त्याचसोबत दोलकाचा दोलनकाल निश्चित का राहतो याचे उत्तर मिळाले. वजनात प्रमाणबद्धता आली. युद्धात वापरल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्र विकासातही या शोधाने योगदान दिले. आता तर रात्रीचा सूर्यप्रकाश मिळवण्यासाठी प्रकल्प उभारला जातो आहे. या महत्त्वाच्या शोधामुळेच मॅक्सवेल, फॅराडे यांच्यासोबत न्यूटन यांचा फोटो आईनस्टाईन यांच्या दालनात होता.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

2 9 APR 2026 पुण्यनगरी

# शेतीसमोरील आव्हाने पेलण्यासाठी संस्थांनी एकत्र यावे : मास्तोळी

## शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शेतीसमोरील बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी कृषी विभाग, विद्यापीठ आणि इतर सर्व संबंधित संस्थांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक बसवराज मास्तोळी यांनी केले.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि प्रकल्प संचालक आत्मा, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी या एकदिवसीय खरीप हंगामपूर्व कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगिरे यांनी उपस्थितांचे स्वागत करतानाच कृषी विभागाच्या विविध योजना आणि खरीप हंगामाच्या पूर्वतयारीचे सविस्तर सादरीकरण केले.

मास्तोळी यांनी आपल्या भाषणात कृषी विभाग, शिवाजी विद्यापीठ, आत्मा आणि उमेद यासारख्या संस्थांनी भविष्यातही शेतकऱ्यांच्या हितासाठी असे संयुक्त कार्यक्रम राबवावेत, असे आवाहन केले. याच सत्रात यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशालेचे प्र. संचालक डॉ. नितीन माळी यांनी ग्रामीण विकास शिक्षणातील संधींचा आढावा घेतला. कार्यशाळेचे खास वैशिष्ट्य म्हणजे शीतल पाटील, डॉ. स्नेहल खांडेकर, डॉ. इराण्णा उडचान, प्रा. डॉ. पी. डी. पाटील आणि सिद्धार्थजी शिंदे लिखित 'भरड धान्यांचा चमत्कार : स्थानिक धान्ये आणि आधुनिक आश्चर्य' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यशाळेत सिद्धार्थ शिंदे, डॉ. विद्यासागर गेडाम, शास्त्रज्ञ डॉ. जयवंत जगताप, डॉ. संकित मोरे, डॉ. के. व्ही. मालशे, नामदेव परीट, डॉ. वावरे, शास्त्रज्ञ डॉ. शांतीकुमार पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा समारोप प्रभारी कुलगुरूंच्या प्रमुख उपस्थितीत झाला. शेवटी डॉ. उर्मिला दशवंत यांनी आभार मानले.